<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६३/२०१६ मधील नि.३२ वरील आदेश</u>

<u>(**CNR NO**. **MHRG**140006492016)</u>

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २६ नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकतीची न्यायालयीन आयुक्तामार्फत मोजणी केल्यास उभय पक्षकारांमधील वाद अंतिमरित्या मिटण्यास मदत होणार आहेत. त्यामुळे तालुका उपअधिक्षक भूमी अभिलेख उरण यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करुन दावा मिळकतीची मोजणी करुन दावा मिळकतीचा मोजणी नकाशा अहवाल देणेबाबत आदेश होणेबाबत विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी हरकत घेवून असे म्हणणे दिले आहे की, सदरचा अर्ज हा खोटा व खोडसाळ असून सदर अर्ज करणेस कोणतेही कारण घडलेले नाही. सदरचा अर्ज कायद्याने टेनेबल नाही. सबब सदरचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, सदरील दाव्याचे कामी हद्दीबाबत तसेच अतिक्रमणाबाबत वाद नसल्याने व सदरचा दाव केवळ निरंतर व तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरीता असल्याने दावा मिळकतीची मोजणी करुन दाव्याचे निकालास कोणतीही मदत होणार नसून उलट मोजणीचा उपयोग वादीला ताबाकब्जाचे पुरावाकरीता होणार आहे असे कथन केले आहे.

४. अर्ज वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता सदरचा दावा निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. दोन्ही पक्षकारांच्या मते भुमि अभिलेख उरण यांनी वादी व प्रतिवादी यांना एकाच मिळकतीचे दोन वेगवेगळे नकाशे दिलेले आहेत. त्यामुळे सत्यपरिस्थीती अभिलेखावर येण्यासाठी व अतिक्रमण निश्चित करणेसाठी तसेच उभय पक्षकारांमधील वाद संपुष्टात येणेसाठी दावा मिळकतीची मोजणी करण्याकरीता तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, उरण यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करणे आवश्यक असून सदरचा अर्ज मंजूर केल्यास योग्य होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
| २. | सदर कामी न्यायालयीन आयुक्त म्हणून तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, उरण, यांची नेमणूक करण्यात येत आहे. |
| ३. | न्यायालयीन आयुक्त यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी दावा मिळकतीची मोजणी करुन दावा मिळकतीचा मोजणी नकाशा अहवाल या न्यायालयास दि. ०४.०८.२०२३ पर्यंत सादर करावा. |
| ४. | वादी यांनी न्यायालयीन आयुक्तांना जरुर ती सर्व कागदपत्रे दयावीत. |
| ५. | वादीने न्यायालयीन आयुक्तांची फी संबंधीत खात्याकडे परस्पर अदा करावी. |
| ६. | येणेप्रमाणे कमीशन पत्र काढणेत यावे. |

ठिकाणी–उरण (निलेश एम.वाली)

दिनांकः २३.०६.२०२३. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण.